अथवा नाममात्र सभासदांना तारण घेवून अथवा तारणाशिवाय कर्ज अथवा उचल देणे.

५. हुंड्या, बिल ऑफ एक्स्चेंज, वचन चिठ्ठ्या (प्रॉमिसरी नोटस्), कुपन्स, ड्राफ्टस, बिल्स ऑफ लँडींग, रेल्वे रिसीटस्, वॉरंटस्, सर्टिफिकेटस् आणि इतर कागदपत्रे व सुरक्षापत्रे काढणे, स्विकारणे, विकत घेणे, विकणे, डिस्काऊंट करणे, वसुल करणे इ. व्यवहार करणे (त्यात हस्तांतर व वर्ग करता येण्यासारखी किंवा हस्तांतर व वर्ग न करता येण्यासारखी या दोन्हींचाही अंतर्भाव राहिल.)

६. हमीपत्रे (लेटर ऑफ क्रेडीट), प्रवासी चेक (ट्रॅव्हलर्स चेक) व सर्क्युलर नोटस् देणे व मंजूर करणे.

७. रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने विदेशी बँक चलन विकत घेणे, विदेशी चलनाचे सर्व व्यवहार करणे, तसेच सोने, चांदी लगड अथवा इतर स्वरुपात खरेदी करणे अथवा विकणे.

८. सर्व प्रकारच्या गुंतवणुकी, स्टॉक्स, शेअर्स, कर्ज रोखे, बॉन्डस्, वचनचिठ्ठ्या, करारनामे, सिक्युरिटीज् स्विकारणे, ताब्यात ठेवणे व यासंबधीचे कमिशन अंडर रायटींग आदी व्यवहार करणे.

९. सर्व प्रकारचे बॉन्डस्, कर्जरोखे, वचनचिठ्ठ्या व इतर प्रकारच्या मौल्यवान वस्तू ठेवीच्या स्वरुपात अथवा सुरक्षित तिजोरीत ठेवण्यासाठी स्विकारणे.

१०. सुरक्षित तिजोरी घर (सेफ डिपॉझीट व्हॉल्ट) व तद्नुषंगीक सेवा पुरविणे.

११. सुरक्षा पत्रे व रोख रक्कमांची देवाण-घेवाण करणे, वसुलीस पाठविणे.

१२. कर्ज व उचलीचे व्यवहार/बोलणी करणे.

१३. ग्राहकांच्या वतीने हमीपत्र देणे (गॅरंटी), नुकसान भरपाई (इंडेमनिटी) पत्रे स्विकारणे, धारण करणे, व्यवहार करणे.

१४. राज्य सरकार, नगरपालिका, सहकारी व इतर संस्था, कार्पोरेशन, संघटना यांचे शेअर्स, कर्जरोखे, कर्ज, स्टॉक्स संबधीचे विमा, खरेदीसाठी पैसे गुंतविणे आणि याबाबतची हमी देणे इ. रितसर व्यवहार करणे.

१५. बँकेच्या हिताच्या व उपयुक्तेच्या दृष्टीने बँकेच्या मालकीची वास्तू संपादन करणे, बांधकाम करणे, दुरुस्ती करणे, देखभाल करणे, विक्री करणे इ. गोष्टी करणे. मिळकती त्याचे हक्क व अधिकार यातील बँकेचे हित हे कर्ज अथवा कोणत्याही सवलतीसाठी तारण अथवा तारणाचा भाग म्हणून ताबा घेणे, धारण करणे अथवा अंशत: येण्यापोटी ताब्यात आलेल्या मालमत्तेची व्यवस्था करणे, विकणे व त्यातून वसुली करणे.

१६. सभासदांना सहकार व बँकींग या विषयांवर प्रशिक्षण देणे.

१७. सहकार खाते व रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये जनतेला बँकींग सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शाखा, विस्तारित कक्ष, ए.टी.एम. अथवा उपकार्यालय उघडणे.